सामना
पुणे शहर
गुरुवार, दि. ११ जानेवारी २०१८

# विद्यार्थ्यांना अग्निशमन केंद्रातील संग्रहालयाची सफर

पंख सामाजिक संस्था आणि क्विकहिल फौंडेशन यांच्या शाळांगण उपक्रमा अंतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या हुतात्मा राजगुरू शाळेतील विद्यार्थ्यांना नुकतीच एरंडवणे अग्निशमन केंद्रातील संग्रहालयाची सफर आयोजित करण्यात आली होती. आगीच्या बंबाला पाचारण कसे करायचे? आग विझवण्यासाठी बंबातून पाण्याचे फवारे कसे मारले जातात? विद्यार्थ्यांना पडलेल्या या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मिळाली. या सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे अग्निशमन अधिकारी गजानन पाथरुडकर यांनी दिली. पंख सामाजिक संस्थेच्या प्रमुख स्मिता आपटे आणि स्नेहल पाटील, मुख्याध्यापिका शारदा शेटे यावेळी उपस्थित होत्या. या कार्यक्रमात एरंडवणे केंद्रातील अग्निशमन जवानांनी सहभाग घेतला. अग्निशमन दलाकडील वायरलेस अधिकारी वासुदेव एकबोटे यांनी या परिश्रम घेतले.

